THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 23RD AUGUST 1894.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याचीं कांहीं कलमें सुधारण्याबाबदचा आणि सन १८७२ चा पंजाबांतील कायद्यांसंबंधी आक्ट याचीं कांहीं कलमें रद्द करण्याबाबदचा मसुदा.

ज्याअर्थी दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याचीं कांहीं कलमें सुधारणें आणि पंजाबांतील कायद्यांसंबंधी आक्टाचीं कांहीं कलमें रद्द करणें योग्य आहे, त्याअर्थी पुढीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१. सदरहू कायद्याच्या ३९व्या कलमाच्या तिसऱ्या पारिग्राफांत, "बादशाही सनदेवरून स्थापिलेल्या कोणत्याही हे कोर्टाच्या" या शब्दांच्या व "ॲडव्होकेटास" या शब्दाच्या दर्म्यान "किंवा पंजाबच्या चीफ कोर्टाच्या" हे शब्द दाखल केले पाहिजेत. १८८२ चा आक्ट १४ याच्या ३९ व्या कलमाची सुधारणा.

२. सदरहू कायद्याचें कलम १८० याच्या पहिल्या व दुसऱ्या पारिग्राफाच्याबदला पुढील मजकूर दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें:— १८८२ चा आक्ट १४ याच्या १८० व्या कलमाची सुधारणा.

"नंतर दुसऱ्या पक्षकारानें आपला वाका कळविला पाहिजे आणि आपला पुरावा (असल्यास) हजीर केला पाहिजे, आणि मग त्यास दरोबस्त मुकदम्याविषयीं एकंदरींत कोर्टापुढें भाषण करण्याचा अधिकार आहे.

"आरंभ करणाऱ्या पक्षकारास त्यानंतर दरोबस्त मुकदम्याविषयीं एकंदरींत प्रत्युत्तर देण्याचा अधिकार आहे."

३. सदरहू कायद्याचें कलम २६० याच्या पहिल्या पारिग्राफानंतर पुढील मजकूर जास्त दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें:— १८८२ चा आक्ट १४ याच्या २६० व्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.

"मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, विवाहहक्क परत मिळण्याबद्दलचा कोणताही हुकुमनामा, कोर्टास पुरत्या कारणांवरून तसा हुकूम फर्माविणें योग्य वाटल्याखेरीज, प्रतिवादीस कैदेंत ठेवून अमलांत आणतां कामा नये. हीं कारणें अशा हुकुमाच्या मुखभागावर लिहिलीं पाहिजेत."

१८८२ चा आक्ट १४ याच्या ५४८ व्या कलमाच्याबदला नवीन कलम दाखल करणें.

४. सदरहू कायद्याचें कलम ५४८ याच्याबदला पुढील कलम दाखल केलें पाहिजे तें येणेंप्रमाणें :—

अपिलाची यादी रजिस्टरांत दाखल करणें.

" ५४८. अपिलाची यादी कबूल होईल तेव्हां अपेलेन्टानें, जितके रेस्पॉन्डेन्ट असतील तितक्या तिच्या नकला साध्या कागदावर दिल्या पाहिजेत.

" अपील कोर्टाचा मुख्य कारभारी किंवा इतर योग्य कामगार यास, रुजुवातीअंतीं सदरहू अपिलाची यादी व नकला बिनचूक आहेत असें आढळेल तर त्यानें त्यांवर सही केली पाहिजे, आणि त्यांवर त्या दिल्याची तारीख लिहिली पाहिजे, आणि मग सदरहू अपील, अपिलें दाखल करण्यासाठीं एक बूक ठेवावयाचें त्यांत दाखल केलें पाहिजे.

" या बुकास अपिलांचें रजिस्टर असें ह्मणावें."

१८८२ चा आक्ट १४ याच्या ५५३ व्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.

५. सदरहू कायद्याचें कलम ५५३ याच्या शेवटीं पुढील मजकूर जास्त दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :—

" या कलमाअन्वयें कोणत्याही रेस्पॉन्डेन्टावर किंवा त्याच्या प्लीडरावर लागू केलेल्या दरेक नोटिशीसोबत, कलम ५४८ यांत सांगितलेल्या अपिलाच्या यादीच्या नकलांपैकीं एक नकल असली पाहिजे."

६. [ हें कलम मुंबई इलाख्यास लागू नसल्याकारणानें तरजुमा केला नाहीं. ]

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

प्रस्तुत मसुद्याचा मुख्य उद्देश, दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याच्या कांहीं कलमांअन्वयें काम चालवितांना येणाऱ्या कित्येक अडचणी वेळोवेळीं हिंदुस्थान सरकारच्या नजरेस आणण्यांत आल्या आहेत त्या दूर करणें, हा आहे.

२. [हा पारिग्राफ मुंबई इलाख्यास लागू नसल्याकारणानें त्याचा तरजुमा केला नाहीं.]

तारीख १० माहे जुलै सन १८९४.

ए. ई. मिलर.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.